दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ८१ वा बुधवार दि.२८ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## जनसन्मान पदयात्रेचा उपक्रम राज्याला दिशा देणारा -आ.पंकजाताई मुंडे

निलंगा/प्रतिनिधी : कोट्यवधी रुपयांची विकास कामे होत असतात परंतु कामे झाल्यानंतर जनतेला भेटून त्यांच्यासमोर नतमस्तक होणारा आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेला जनसन्मान पदयात्रेचा उपक्रम राज्याला दिशा देणारा आहे,असे प्रतिपादन भाजपाच्या राष्ट्रीय सचिव, माजीमंत्री आ. पंकजाताई मुंडे यांनी केले. आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी निलंगा विधानसभा मतदारसंघात काढलेल्या जनसन्मान पद यात्रेदरम्यान मंगळवारी (दि.२७) सकाळी वलांडी येथे आ.मुंडे यांच्या उपस्थितीत जाहीर सभा संपन्न झाली.माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या सभेस जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भगवानदादा पाटील तळेगावकर,माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, मिलिंद लातुरे,किरण उटगे, बापूराव राठोड,माजी जिप उपाध्यक्षा भारतबाई साळुंके,जिल्हा संघटन सरचिटणीस संजय दोरवे, माजी सभापती गोविंद चिलकुरे,विधानसभा प्रभारी दगडू साळुंके, प्रशांत पाटील, चंद्रशेखर महाजन,सदाशिव पाटील, कुमार पाटील,यशवंत पाटील,राम रेड्डी,पप्पू पाटील,यशवंत कांबळे, बालाजी धनगावे, सुखानंद काळशेट्टे,सुरेश शिंदे, सुग्रीव किसवे,लातूर शहराध्यक्ष देविदास काळे, सुधीर धूत्तेकर,प्रदेश प्रवक्त्या प्रेरणाताई होनराव,तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे,मंगेश पाटील,कुमोद लोभे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना पंकजाताई म्हणाल्या की,विकास करणे हे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे.आ. संभाजीराव पाटील यांनी कोट्यवधींची कामे केलेली आहेत.ती केल्यानंतरही जनतेसमोर जाऊन नतमस्तक होण्याचा हा उपक्रम स्तुत्य आहे. जनतेच्या सन्मानासाठी, नागरिकांना भेटण्यासाठी आ.संभाजीराव पाटील यांनी ३०० किलोमीटरची





पदयात्रा काढली आहे.ते जनतेत जात आहेत. भेटीगाठी घेत आहेत. समाजात मिसळून नागरिकांची मते,प्रतिक्रिया जाणून घेत आहेत.त्यामुळे तीनशे किलोमीटरच्या या पदयात्रेनंतर निलंगा विधानसभेतील नागरिक तीन हजार पट अधिक मतांनी त्यांच्या पाठीशी उभे राहतील,असेही त्या म्हणाल्या.आज ज्या पद्धतीने आपणावर पुष्पवृष्टी होत आहे त्याच पद्धतीने मतांची वृष्टीही होईल,असे त्या म्हणाल्या. आ.संभाजीराव पाटील निलंगेकर नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी होतात.जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी अग्रभागी असतात.संकटात धावून येतात.आपल्या सुख- दुःखात धावून येणाऱ्या या नेत्याच्या पाठीशी उभे रहा,असे आवाहनही त्यांनी केले. आ.संभाजीराव पाटील हे स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या तालमीत घडलेले कार्यकर्ते आहेत. जनतेचे प्रश्न सोडविण्याची क्षमता व धमक त्यांच्यात आहे,असेही पंकजाताई म्हणाल्या. यावेळी बोलताना आ. संभाजीराव पाटील म्हणाले की,माझी व मुंडे साहेबांची पहिली भेट वलांडी येथेच झाली होती. स्व.मुंडे साहेबांनीच देवणी तालुक्याची निर्मिती केली आहे.त्यांच्या स्वप्नातील तालुका विकसित करण्याचे काम एक कार्यकर्ता म्हणून मी करत आहे.मुंडे यांचे तालुक्यावर अन तालुक्याचे मुंडे यांच्यावर कायमच प्रेम राहिलेले आहे.हे प्रेम यापुढेही कायम राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम पाटील, सूत्रसंचलन प्रशांत पाटील दवणहिप्परगेकर तर आभार प्रदर्शन रामलिंग शेरे यांनी केले.

## श्रावणी सोमवार निमित्त आ.अमित देशमुख यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वरांची महाआरती

लातूर/प्रतिनिधी : श्रावणी सोमवार निमित्त माजी मंत्री आ.अमित देशमुख यांच्या हस्ते लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांची महाआरती करण्यात आली. लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी श्रावण महिन्यात मोठी गर्दी होते.त्यातही सोमवारी हजारोंच्या संख्येने भक्त दर्शनासाठी येत असतात.देवालयाच्या वतीने दर सोमवारी श्री सिद्धेश्वरांची महाआरती केली जाते.श्रावणी सोमवारचे औचित्य साधून माजीमंत्री आ.अमित देशमुख यांच्या हस्ते सोमवारी (दि.२६) ही महाआरती संपन्न झाली. आ.देशमुख यांनी श्री. सिद्धेश्वरांचे दर्शन घेऊन आरती केली.लातूरकरांना सुखी ठेवण्याची प्रार्थना त्यांनी श्री सिद्धेश्वरांच्या चरणी केली. यावेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विक्रमतात्या गोजमगुंडे,सचिव अशोक भोसले,माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर,विश्वस्त रमेशसिंह बिसेन, रविशंकर जाधव,गोरोबा लोखंडे,संजय निलेगांवकर यांच्यासह महाआरती समितीचे विशाल झांबरे, सचिन आलमले,आशिष साठे, राम गोरड,सुधीर भुतडा आदींची प्रमुख उपस्थिती होती.



महाआरतीचा उपक्रम राबवित असल्याबद्दल आ. देशमुख यांनी देवस्थानचे विश्वस्त आणि महाआरती समितीच्या पदाधिकाऱ्यांचे यावेळी कौतुक केले. देवस्थानच्या परिसरात पुरातत्व विभागाच्या वतीने तीर्थकुंडाचे काम तसेच विकासकामे सुरू आहेत. या कामांची पाहणीही आ.देशमुख यांनी केली.या कामांसाठी निधी कमी पडणार नाही असे आश्वासनही त्यांनी यावेळी बोलताना दिले. यावेळी भाविक-भक्त आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## रेणापूर शहरातील विविध ८ विकास कामासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून १० कोटीचा निधी

लातूर :- राज्याच्या नगर विकास विभाग अंतर्गत वैशिष्ट्यपुर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजनेतून रेणापूर नगरपंचायत अंतर्गत यलम(रेड्डी) समाज भवन बांधकामासह विविध आठ विकास कामासाठी तब्बल १० कोटी रुपयांचा निधी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मंजूर झाला असून सदरील निधी मंजूर झाल्याने रेणापूर येथील पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

रेणापूर शहरातील विविध विकास कामासाठी निधी मिळावा याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्यातील महायुती शासनाचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि भाजपाचे नेते राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्याने नगर विकास विभागाच्या सन २०२४ - २५ वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत नगर परिषदांना निधी यातून २६ ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार रेणापूर नगरपंचायत अंतर्गत आठ कामाकरिता तब्बल १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आजपर्यंत रेणापूर शहराच्या सर्वांगीन विकासासाठी पाणीपुरवठा योजना, ग्रामदैवत श्री रेणूकादेवी मंदिर परिसरात भक्त निवास, रेणा नदीवर घाट बांधकाम व सुशोभिकरण, अशोक सम्राट बौध्द विहार, श्री. बालाजी मंदिर सुसज्य सभागृह, मुस्लीम बांधवांसाठी शादीखाना, श्रीराम मंदिर परिसर विकास, नगर पंचायत प्रशासकीय इमारत व व्यापारी संकुल अंतर्गत सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, अग्नीशामन वाहन व इमारत यासह विविध विकास कामासाठी आतापर्यंत शासनाच्या विविध विभागाअंतर्गत कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करुन आ. रमेशअप्पा कराड यांनी रेणापूरच्या विकासाला मोठी गती दिली आहे. अनेक विकासाची कामे कार्यान्वित केली तर नवीन कामे प्रगती पथावर आहेत, एवढा मोठा निधी आजपर्यंत कधीच रेणापूरच्या इतिहासात मिळाला नव्हता.

वैशिष्ट्यपुर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजनेतून २६ ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार रेणापूर नगर पंचायत अंतर्गत हायमास्ट, एलईडी, सोलार पथदिवे बसवणे ५ कोटी, यलम(रेड्डी) समाज भवन बांधकाम करणे २ कोटी, सिमेंट रस्ता व सिमेंट नाली बांधकाम करणे १ कोटी १० लक्ष, गोसावी समाज स्मशानभुमी बांधकाम करणे २५ लक्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर बांधकाम करणे २५ लक्ष, यलम गल्ली येथे हनुमान मंदिर सभागृह बांधकाम करणे ५० लक्ष, हणमंतवाडी येथे स्मशानभुमी बांधकाम करणे ४० लक्ष, काळेवाडी येथील सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे ५० लक्ष रुपये असे एकूण आठ कामासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



रेणापूरच्या सर्वांगीन विकास कामासाठी कोट्यावधीचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी नगराध्यक्षा आरती राठोड, संगायो समिती सदस्य चंद्रकांत कातळे, माजी सभापती दत्ता सरवदे, विजय चव्हाण, दिनकर राठोड, उज्वल कांबळे, श्रीकृष्ण मोटेगावकर, भाजपा शहराध्यक्ष अच्युत कातळे, भाजयुमो शहराध्यक्ष संतोष राठोड, शेख अजीम, महेश गाडे, राजकुमार आलापुरे, उत्तम चव्हाण, मारूफ आतार, उत्तम घोडके, दिलीप चव्हाण, अंतराम चव्हाण, रमेश वरवटे, रमेश चव्हाण, गणेश चव्हाण, सचिन सिरसकर, धम्मानंद घोडके, नंदकुमार बंडे, रोहित खुमशे, योगेश राठोड, नागेश बस्तापुरे, मनोज चक्रे, गणेश माळेगावकर, दिलीप आकनगिरे, लखन आवळे, अजय मर्लापल्ले, दत्ता बाळे, सुरज अकनगिरे, सुनिल आलापुरे, अनंत आलापुरे, पिंटू दरोडे, सुरज फुलारी, पप्पू कुडके, हनुमंत भालेराव, व्यंकट आकनगीरे, जगन्नाथ कातळे, परमेश्वर राठोड, बाबु गिरी, रमाकांत गिरी, सुनिल गिरी, युवराज पुरी, गोविंद गिरी, व्यंकट पुरी यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या वतीने आभार व्यक्त केले आहेत.

## स्पेन,मेक्सीको, विदेशी पर्यटकांनी महाराष्ट्राच्या सहस्त्रकुंडला भेट

### स्पेन, मेक्सीकोची टीम

:या दौऱ्यातील सुट्टीच्या दिवसाचा आनंद लुटण्यासाठी स्पेन, मेक्सीको या देशातील टीमने महाराष्ट्रातील नामांकित पर्यटन स्थळ असलेल्या सहस्त्रकुंड धबधब्यांना २५ ऑगस्ट रोजी अचानक अकरा वाजेच्या सुमारास भेट दिली. या भेटीदरम्यान या टीमशी संवाद साधत असताना महाराष्ट्रातील एक अनमोल रत्न असलेला हा सहस्त्रकुंड धबधबा असून मनमोहक व उत्साहवर्धक निसर्गाकडून निर्माण झालेला एक अजूबा आहे असे मत या विदेशी पर्यटकांनी मत व्यक्त केले. या पर्यटन स्थळाची महाराष्ट्र शासनाने योग्य ती दखल घ्यावी व या पर्यटन स्थळाचा विकास साधावा.



किनवट/ शेख शौकत किनवट महाराष्ट्रातील मराठवाडा विदर्भाच्या सीमेवर असलेला आणि निसर्गाच्या सानिध्यात नटलेला सुप्रसिद्ध धबधबा म्हणून सहस्त्रकुंड धबधब्याकडे बघितले जाते. या सहस्त्रकुंड धबधब्यावर मनोहरी दृश्याने अनेक पर्यटकांना भुरळ टाकली. त्यातच हा धबधबा पाहण्यासाठी आंध्रप्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्रासह राजस्थान या राज्यातूनही पर्यटक या धबधब्याकडे आकर्षिले जात आहेत. इतकेच नव्हे तर, येथील पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आता वेगवेगळे विदेशाचे पर्यटकांनी भारतात येऊन सनी आनंद घेत आहे. स्पेन, मेक्सीको या देशातील विदेशी पर्यटकांनी सहस्त्रकुंडला हजेरी लावली येथील निसर्गाचा आनंद घेण्यास सुरूवात केली आहे. वेली फुलाने पक्षाच्या किलबिलाटासह निसर्ग पर्यटन संकुलाच्या आणि पैनगंगा अभयारण्य निसर्गाच्या सानिध्यात नटलेल्या या धबधब्याने ते आता चक्क महाराष्ट्रच नव्हे तर देशाच्या बाहेर असलेल्या स्पेन मेक्सीको विदेशी पर्यटकांनाही मनमोहीत केल्याचे दृश्य आता पहावयास मिळत आहे. स्पेन मेक्सीको या देशातील टीमने भारतातील तेलंगणा राज्यातील म्हैसा येथे पुण्याच्या एका संस्थेच्या माध्यमातून आयुर्वेद संदर्भात अभ्यास करण्यासाठी दौरा आयोजित केला आहे.

### शासनाने लक्ष द्यावे

:या पद्धतीचे पर्यटनस्थळ जर आमच्या देशात असतं तर आमच्या देशाचे सरकार अशा पर्यटन स्थळासाठी अब्जावधी रुपये खर्च केल असते असे ते यावेळी चर्चा करीत असल्याचे ऐकावयास मिळाले. विदेशातील पर्यटकांच्या भावनांचा विचार करून शासनाने लक्ष द्यावे अशा स्वरूपाची मागणी आता पर्यटनप्रेमी मंडळी करून करण्यात येत आहे.

## विजय जीएनएम नर्सिंग स्कुलच्या वतीने महिलांवरील अत्याचाराच्या निषेधार्थ आक्रोश कँडल मार्च

लातूर : श्री दादासाहेब शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित विजय जीएनएम नर्सिंग स्कुलच्या वतीने बांगलादेशातील महिलांवरील महिलांवरील झालेल्या अन्याय अत्याचार तसेच कोलकाता येथील महिला डॉक्टरवर झालेल्या बलात्कार व निर्घृण हत्येचा निषेधार्थ आक्रोश कँडल मार्च काढण्यात आला.



मंगळवारी सायंकाळी चार वाजता रवींद्रनाथ टागोर नगरपासून हा आक्रोश कँडल मार्च मिनी मार्केट मार्गे गांधी चौकात आला. गांधी चौकात नर्सिंग स्कुलच्या विद्यार्थी - विद्यार्थिनींनी ' चिडिया ' चिडिया नावाचे पथनाट्य सादर करून देशात घडणाऱ्या महिलांवरील अत्याचाराचे प्रात्यक्षिक प्रस्तुत करून जनजागृती केली. देशात अशा घटना भविष्यात घडू नये यासाठी कठोरात कठोर कायदा व्हावा अशी मागणीही यावेळी करण्यात आली. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग मधील छत्रपती शिवरायांच्या पुतळा कोसळल्याच्या घटनेचाही संस्थेच्या वतीने तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. या कँडल मार्च व चिडिया पथनाट्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. पथनाट्य पाहताना अनेकांच्या डोळ्यांच्या कडाही यावेळी पाणावल्याचे निदर्शनास आले. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सौ. अंजली शरदराव जाधव किणीकर, संस्थेचे सचिव शरद विजयकुमार जाधव किणीकर, कोषाध्यक्ष दिग्विजय शरदराव जाधव किणीकर, संस्था सदस्य सचिन पाटील, बसवराज बिराजदार, मुस्लिम राष्ट्रवादी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मकबूल वलांडीकर , माधवराव बिराजदार, शंकर गड्डे, तज्ज्ञ संचालक शमभाऊ चव्हाण, मनोज आडाणे , प्राचार्य सिद्धेश्वर नागरगोजे, मोहित भालेराव, विजय पाटील, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# वाढती अस्वस्थता !

जगात आज अनेक ठिकाणांहून संघर्ष आणि युद्धाच्या बातम्या मोठ्या प्रमाणावर येत आहेत. ही वाढती जागतिक अस्वस्थता कोणत्या आपत्तीला निमंत्रण देणारी ठरणार आहे याचा अंदाज अजून कोणालाच येईनासा झाला आहे. एकीकडे इस्रायल आणि लेबनॉनमधील संघर्षाला अचानक मोठे स्वरूप प्राप्त झाले असतानाच तिकडे रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाची स्थितीही शिगेला पोहोचली आहे.

काल रविवारी लेबनॉनमधील हेजबुल्ला संघटनेने इस्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे डागली, तर सोमवारी युक्रेनच्या आक्रमकपणाला प्रत्युत्तर म्हणून रशियाने युक्रेनवर तीनशे ड्रोन व क्षेपणास्त्रांनी हल्ला चढवला. या हल्ल्यांना दुसर्या बाजूकडून प्रत्युत्तर देण्याची मोठ्या प्रमाणात तयारी सुरू झाली आहे. मध्यपूर्वेत इस्रायलच्या विरोधात पॅलेस्टाइनमधील हमास, लेबनॉनमधील हेजबुल्ला आणि येमेनमधील हौथी यांनी संघटितपणे आघाडी उघडली असून त्यांना आता इराणच्या रेव्होल्युशनरी गार्डचीही मदत मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हमासच्या नेत्याची इस्रालयने इराणमध्ये हत्या केल्यानंतर त्याचा बदला घेण्यासाठी इराण टपलेलेच आहे. ते इस्रायलवर हल्ल्याची संधीच शोधत आहेत. गेल्या जुलै महिन्यात अमेरिकेच्या पुढाकाराने तेथे शांततेची चर्चा झाली, पण या चर्चेच्या वेळी जे ठरले आहे त्याला कोलदांडा घातल्याचा आरोप इस्रायल आणि हेजबुल्ला यांनी एकमेकांवर केल्याने तडजोडीचे अमेरिकेचे प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. तिकडे सन २०२२ पासून सुरू असलेल्या रशिया–युक्रेन संघर्षाने गेल्या दोन दिवसांत अत्यंत उग्र स्वरूप धारण केले आहे. युक्रेनने थेट रशियातील मोठ्या भूप्रदेशात आक्रमण करून रशियाला नामोहरम करण्याचा प्रयत्न सुरू केल्यानंतर रशियाने आपल्या भात्यातील क्षेपणास्त्रे बाहेर काढून युक्रेनला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. युक्रेन जर आटोक्यात आला नाही, तर रशिया त्यांच्याकडे असलेल्या अण्वस्त्रांचा शेवटचा पर्याय वापरू शकते काय, या चिंतेने जगाला सध्या ग्रासले आहे. तसे झाले तर त्याची व्याप्ती जागतिक स्तरावर वाढू शकते. एकमेकांशी संघर्ष करीत असलेल्या या देशांमध्ये शांतता किंवा तडजोड करण्यासाठी जागतिक पातळीवरून जे प्रयत्न अपेक्षित आहेत ते होताना दिसत नाहीत. किंबहुना अशा प्रसंगी संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेने जे प्रयत्न करणे अपेक्षित असते तेही त्यांच्याकडून होताना दिसत नाहीत. जगातला कोणताही प्रश्न चर्चेने सुटू शकतो अशी जी धारणा असते त्यालाच या दोन्ही ठिकाणच्या संघर्षात तिलांजली दिली गेली आहे. नमते कोणी घ्यायचे यावर हे तडजोडीचे प्रयत्न अडले आहेत. इस्रायल आणि त्यांचे शत्रू, रशिया आणि युक्रेन हे सगळेच जण एकदाच काय तो सोक्षमोक्ष लागला पाहिजे अशा निकरावर आले आहेत आणि बाकीचे जग निवांत बसून हा सारा संहार पहात बसले आहे, असे जे चित्र निर्माण झाले आहे ते वेदनादायी आहे.नुकतेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिया–युक्रेन युद्धात शांतता प्रस्थापित करण्यासाठी थोडे प्रयत्न करून पाहिले. पण त्यात त्यांना दुर्दैवाने यश आलेले नाही. किंबहुना त्यांच्या दोन्ही देशांच्या नेत्यांबरोबर झालेल्या चर्चे नंतर त्या दोन्ही देशांमधील एकमेकांवरील हल्ले आणखीनच तीव्र झालेले पाहायला मिळाले आहेत. मोदींनी रशियाचे अध्यक्ष पुतीन यांना मिठी काय मारली, तिकडे युक्रेनच्या नेत्यांचे माथे भडकले. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी मोदींच्या या कृत्यावर थेट शब्दांत आक्षेप घेतलेला दिसला. मोदींची ही कृती म्हणजे शांतता प्रक्रियेवरचाच विनाशकारी हल्ला असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. याचाच अर्थ असा की, मोदींच्या प्रयत्नांना दोन्ही देशांनी जराही दाद न दिल्याने बाकीच्या देशांची आपण या भानगडीत न पडलेलेच बरे अशी धारणा झाली असल्यास नवल नाही. दोन्ही ठिकाणचा संघर्ष त्यांच्या पुरताच मर्यादित न राहता त्याची व्याप्ती जागतिक स्तरावर वाढण्याचा जो धोका निर्माण झाला आहे तो अधिक चिंताजनक आहे. युक्रेनच्या बाजूने युरोपीय देश एकवटले आहेत. ते रशियाला दमात घेऊ पहात आहेत, तर दुसरीकडे मध्यपुर्वेतील संघर्षात इराण उतरला, तर त्यांनाही जरबेत घेण्यासाठी अमेरिका आणि त्यांची दोस्त राष्ट्रे या संघर्षात उतरण्याचा धोका नाकारता येत नाहीत. त्यामुळे ही संघर्षाची स्थिती येणार्या काळात कशी वळण घेणार याकडे सगळ्या जगातील लोक लक्ष ठेवून आहेत. ही जागतिक अस्वस्थता सगळ्याच क्षेत्रातील विपरीत परिणामांना निमंत्रण देणारी ठरणार आहे. हा धोका जागतिक अर्थकारणासाठीही काळजी वाढवणारा आहे. जगात संघर्ष पेटता ठेवणे हे अमेरिकेसारख्या काही मोठ्या राष्ट्रांचा आवडता खेळ असतो, असे चित्र जगभरातील विचारवंतांनी आपल्यापुढे उभे केलेलेच आहे. अमेरिकेला त्यांची शस्त्रास्त्रे विकायची असतात त्यामुळे ते असा संघर्ष सतत पेटता कसा राहील या प्रयत्नांत असतात हा त्या विचारवंताचा आवडता युक्तिवाद असतो. तो काही प्रमाणात पटणाराही असतो. वास्तविक संयुक्त राष्ट्रांचे व्यासपीठ वापरून हा संघर्ष आटोक्यात आणणे अमेरिकेला अशक्य नाही. या संघटनेवर अमेरिकेचा मोठा प्रभाव आहे. पण तो ते वापरताना दिसत नाहीत. त्यामुळे जागतिक विचारवंतांच्या मुद्द्यांची सत्यता पटू लागते. तिकडे जगाच्या व्यासपीठावर अमेरिका आणि चीन यांच्यातील वाढत्या स्पर्धेचेही सावट आहे. प्रत्येक आंतरराष्ट्रीय विषयाकडे अमेरिका–चीन संघर्षाच्या चौकटीतूनच पाहिले जाते. रशिया–युक्रेन संघर्षात हाच अँगल आहे. चीन रशियाच्या पाठीशी आहे हे केव्हाच स्पष्ट झाले आहे. रशियावर जगाने आर्थिक निर्बंध लागू केल्यानंतर त्यांच्या तेलाचे सर्वात मोठे गिर्हाईक चीन ठरले आहे आणि त्या मदतीमुळे रशिया तगून आहे. चीनपाठोपाठ भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल आयात करीत आहे. त्यामुळे अमेरिकादि राष्ट्रे भारतावर खार खाऊन आहेतच. हे सगळे आपसांतील गुंतागुंतीचे हितसंबंध या वाढत्या अस्वस्थतेला कारणीभूत ठरतात. जगात आज अनेक ठिकाणी जागतिक तापमान वाढीतून निर्माण झालेले नैसर्गिक संकटांचे आव्हान मोठे असताना त्यात ही सगळीकडे उद्भवणारी युद्धजन्यस्थिती आटोक्यात राहावी, असे कोणालाच कसे वाटत नाही हा काळजी वाढवणारा प्रश्न आहे.

# मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी गुन्हेगारांना फाशीची शिक्षा आवश्यक.

मुलींवरील वाढत्या अत्याचारांने संपूर्ण हद्दीपार करून शिखर गाठला आहे.त्यामुळे सर्वप्रथम कोणत्याही परिस्थितीत पोलिसांकडून गुन्हेगारांचे लचके तोडून त्यांना कठोर शिक्षा देण्याची नितांत गरज आहे.कारण छोट्या–छोट्या मुलींवरील अत्याचारांच्या घटनांनी सर्वांचीच मनस्थितीत संतापजनक झाली आहे.कारण सर्वच स्तरातून मागणी उठत आहे की पिडीतांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने गुन्हेगारांवर कठोर कारवाई अपेक्षित आहे.कारण गुन्हेगारांवर कठोर कारवाया झाल्या नाहीत तर अशा भयावह घटना वाढत जाईल. त्यामुळे राज्यात किंवा देशात गुन्हेगारांवर अशा कारवाया व्हायला पाहिजे की दुसऱ्या गुन्हेगारांवर त्याचा ताबडतोब परिणाम झाला पाहिजे.यामुळे गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण होईल व पुन्हा गुन्हां करतांना शंभरदा विचार करावा लागेल.देशातील अनेक राज्यांतील मुलींवरील व महिलांवरील अत्याचारा पहाता अंगावर शहारे येतात. नुकताच पश्चिम बंगालची महिला अत्याचाराची घटनेचे पडसाद संपूर्ण भारतात उमटले.यावर शेवटी सुप्रीम कोर्टाने हस्तक्षेप केला. अशा अनेक घटना दिवसेंदिवस कमी न होता वाढतच आहे हा देशासाठी व देशातील प्रत्येक राज्यांसाठी मोठा गंभीर विषय बनला आहे. नुकताच महाराष्ट्रात बदलापूर घटनेने शाळकरी मुलींच्या सुरक्षिततेच्या बाबतीत मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दिवसेंदिवस मुलींवरील व महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. आपण ज्यांना देवाघरी फुले म्हणतो अशांना कोणी इजा पोहचवित असेल व अत्याचार करीत असेल तर त्याला जागीच ठेचले पाहिजे.यासाठी सरकारने पोलिस विभागाला खुली सुट देणे अत्यंत गरजेचे आहे. पोलिस गुन्हेगारांना पकडतांना आपला जीव धोक्यात टाकतो व गुन्हेगाराला पकडतो.परंतु अट्टल गुन्हेगार कायद्याच्या चाकोरीतून सुटतो.ही सुध्दा पोलिस विभागासाठी चिंताजनक बाब आहे. त्यामुळे सर्वप्रथम पोलिसांकडुन गुन्हेगारांना असय्य यातना अती आवश्यक आहे.कारण गुन्हेगारांना जास्त दिवस जेलमध्ये ठेवले तर त्यांना मोकळीक होण्यासाठी अनेक मार्ग निवडता येतात. जसे की,जमानत,पेरॉल,बेल फिर वही खेल ह्या संपूर्ण घटनाक्रम सर्वांच्याच डोळ्यापुढे आहे.त्यामुळे गुन्हेगारांना पोलिसांच्या मार्फत जागीच ठेचले पाहिजे.महिलांवरील अत्याचार व बलात्कारांमध्ये अट्टल गुन्हेगारांचा समावेश आहेच सोबतच यात राजकीय पुढारीसुध्दा मोठ्या प्रमाणात गुरफटलेला आहे. त्यामुळे प्रश्न आहे की कठोर कारवाईचे प्रावधान केव्हा? महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधील अत्याचारांच्या घटनेमुळे देशातील नागरिकांचे व पालकांचे मन हेलावले आहे.देशातील अनेक राज्यात महिलांवरील अत्याचार व बलात्कार करून खून करने अशा अनेक भयावह घटना झाल्यात. परंतु गुन्हेगारांवर कायद्याच्या चाकोरीतून जेव्हा कारवाई होतांना आपण पहातो तेव्हा आपल्याला आश्चर्य वाटले.कारण कायद्याच्या चाकोरीतून हजारो कागदांची फाईल तयार होते व तारीख पे तारीख असा लपंडाव सुरू असतो व कालांतराने जमानत मिळते व गुन्हेगार सुटतो सुध्दा त्यामुळे अशा गुन्हेगारांवर पोलिसांच्या मार्फत तोडायला पाहिजे व फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून कठोर कारवाई व्हायला हवी. गुन्हेगारांसाठी कायदा करणारे नेतेमंडळी सुध्दा महिला अत्याचारांच्या बाबतीत मागे नाहीत.असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) आणि न्यु इलेक्शन वॉच यांनी महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांचा अहवाल प्रसिद्ध केला आहे.त्यानुसार १५१ विद्यमान खासदार आणि आमदारांवर महिला अत्याचारांचे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याच्यावरील कारवाई अत्यंत संथगतीने सुरू असते व कालांतराने धनसंपत्तीच्या बळावर गंभीर गुन्ह्यांतुन मुक्त सुध्दा होतात.हे तर फक्त विद्यमान आमदार–खासदार झालेत या व्यतिरिक्त आजी–माजी आमदार–खासदार किती असतील याचा अंदाज आपण लावु शकतो.त्यामुळे राजकीय पुढारी असो अथवा अन्य गुन्हेगार त्यांची चामडी सर्वप्रथम पोलिसांच्या मार्फत उधळली पाहिजे व नंतर बाकिच्या कारवाया व्हायला हव्या.बलात्कार अशा भयावह घटनाच्या गुन्हेगारांवर सरकार फाशीचे बिल अजुन पर्यंत पारीत करू शकले नाही ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.कारण या गुन्ह्यामध्ये राजकीय पुढारी व भोंदू बाबांचा जास्त भरणा आहे ही बाब सर्वांनाच चांगल्याप्रकारे ग्यात आहे.अल्पवयीन मुलींवरील अत्याचारांचे प्रमाण एवढे वाढले आहे की ज्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही.मुलींवरील अत्याचारांच्या घटनेचा मोटा–मोटा आढावा घेतला तर मागील एका आठवड्याभरातील घटनाक्रम याप्रमाणे १३ ऑगस्ट बदलापूर,१५ ऑगस्ट पुणे,२० ऑगस्ट अकोला,२० ऑगस्ट मुंबई,२१ ऑगस्ट नाशिक,२१ ऑगस्ट पुणे,२१ ऑगस्ट मुंबई,२२ ऑगस्ट नागपूर,२२ ऑगस्ट कोल्हापूर अशाप्रकारे आठवड्याभरातील मुलींवरील अत्याचारांच्या घटना आहेत.यावरून प्रश्न उपस्थित होतो की राज्यातील मुली खरोखरच सुरक्षित आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.त्यामुळे मुलींवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी कायद्याच्या माध्यमातून फाशीची शिक्षा व्हायला हवी.

**********

लेखक

रमेश कृष्णराव लांजेवार

(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# वय झाले म्हणजे म्हातारे झाले असे होत नाही.

भारतीय उद्योग क्षेत्रातील उद्योगरत्न मा.रतनजी टाटांनी (आता वय ९४ वर्ष) चित्रपट सृष्टीचे महानायक प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन जन्म ११ ऑक्टोबर १९४२ वय ८२ आज ही सिनेमा,जाहिरात,कोण बनेगा करोडपती सारख्या शो मध्ये दमदारपणे काम करीत आहेत. देशातील राजकारणातील सुप्रसिद्ध आणि कुप्रसिद्ध जाणते राजे श्री.शरदचंद्र पवार जन्म १२ डिसेंबर १९४०,वय ८४ आज ही घरात न बसता पायाला भिंगरी लाऊन फिरतात.राजकारणात त्यांचे जेवढे मित्र आहेत त्यांचा किती पटीने शत्रू सुद्धा आहेत.तरी वय झाले म्हातारा झाले म्हणून घरात बसत नाही.आपण सेवा निवृत झाला म्हणजे म्हातारे झाला असे नाही.हेच मी या लेख द्वारे सेवानिवृत झालेल्या कर्मचारी अधिकारी यांना सांगण्याचा प्रयत्न करतो.

नोकरीत असतांना प्रथम स्वताचे लग्न. नंतर मुलांचे शिक्षण त्यांची नोकरी मुलाचे लग्न यातच आपण सेवा निवृत होत असतो.यात आपण काय विसरतो तर श्रीमंत होण्यासाठी आपल्या मुलांना शिकवतो.पण त्यांना आनंदी राहण्यासाठी शिकवत नाही. ज्यामुळे मोठ झाल्यावर त्यांना वस्तूंचं महत्त्व आणि मूल्य कळेल किंमत नाही.तुमचं जेवण तुम्ही तुमचं औषध समजून घ्या नाहीतर औषधच तुम्हाला जेवण म्हणून घ्यावं लागेल.जी व्यक्ती तुमच्यावर प्रेम करते ती तुम्हाला कधीही सोडून जाणार नाही कारण तुम्हाला सोडून जाण्याची शंभर जरी कारणं असली तरीही त्या व्यक्तीला एकच कारण असं सापडेल की ज्यामुळे ती व्यक्ती तुम्हाला सोडून जाणार नाही.मानव असणे आणि मानवता असणे या मध्ये खूप फरक आहे.ज्या वेळी तुमचा जन्म होतो त्यावेळी तुमच्या वर प्रेम केले जाते. आणि ज्यावेळी तुम्ही मृत होता त्या वेळी ही तुमच्या वर प्रेम केले जात नाही. त्यावेळी दहा बारा तासाच्या आत तुमची बॉडी घराबाहेर काढली जाते. कारण तुमचे शरीर त्यांच्या कामाचे उरले नसते. तुमचे कपडे लत्ते,औषध,चश्मा,काठी उशी काहीच घरात ठेवले जात नाही.का?. तुम्ही कमवलेली संपती,पॉपर्टी गाडी,बंगला प्लॉट शेतजमीनचा सातबारा कोणी का देत नाही?. परंतु अशा वेळी तुम्ही ज्या संस्था संघटनेत काम करत होता. ते जमवलेली मित्र मंडळी हितचिंतक तुम्हाला एकटे सोडत नाही. शेवट पर्यन्त म्हणजे अग्नी देपर्यंत तुमच्या साठी थांबतात.म्हणूनच सेवेत असतांना आणि सेवानिवृत झाल्यावर संस्था संघटनेत कायम स्वरूपी किर्याशील राहा. घरातील मंडळी एका महिन्यात विसरतील पण समाजातील संस्था,संघटनेतील लोक प्रत्येक वेळी आठवण काढतील.प्रत्येक जन आंदोलनात,सामाजिक,शैक्षणिक कार्यात आपला सहभाग आणि आर्थिक योगदान इतरांना कायम प्रेरणा देणारी आणि लक्षवेधी असणारी असायला हवी. जे सेवा,नोकरी करीत असतांना जमले नाही. ते सेवा निवृती नंतर करू शकता. म्हणूनच हे विसरा वय झाले म्हणजे म्हातारे झाले असे होत नाही.

सेवा,नोकरी करणाऱ्यांनी लक्षात ठेवावे तुम्हाला वेगात चालायच असेल तर एकटं चाला पण दूरवर चालत जावे लागणार असेल तर एकत्र चाला.जगातील सर्वात चांगले सहा डॉक्टर १) सूर्यप्रकाश २) विश्रांती ३) व्यायाम ४) योग्य आहार ५) आत्मविश्वास आणि ६) मित्र.यांना आयुष्याच्या सगळ्या टप्प्यांवर यांना सांभाळा आणि आरोग्यदायी जीवन जगा.जेव्हा तुम्ही चंद्र पाहता त्यावेळी तुम्ही निसर्गाने दिलेले सौंदर्य पाहता,जेव्हा तुम्ही सूर्य पाहता त्या वेळी तुम्ही निसर्गाचे सामर्थ्य पाहता,ज्यावेळी तुम्ही आरसा पाहता त्यावेळी तुम्ही निसर्गाची सर्वोत्कृष्ट निर्मिती पाहता.म्हणून स्वतःवर विश्वास ठेवा! आपण सगळे जण प्रवासी



आहोत आपला अंतिम मुक्काम आधीच ठरलेला आहे हे जीवन ही एक सहल समजून आनंद घ्यावा आणि इतरांना द्यावा. मी अधिकारी होतो,मॅनेजर होते. हे विसरून समाजात वावरला तर प्रत्येक ठिकाणी प्रत्येक कार्यात मान सन्मान आपो आप मिळत असतो. पण त्यासाठी सहभाग आर्थिक योगदान देता आले पाहिजे.

नोकरीवर असा किंवा नसा एक मात्र लक्षात ठेवा जिभेचे वजन खूप हलके असते पण तिचा तोल सांभाळणे खूप कठीण असते.जीवन जगायचं पावलांप्रमाणे.प्रथम पडणार्या पावलाला गर्व नसतो,आणि मागे पडणाऱ्या पावलाला कुठलाच कमीपणा नसतो. पाठ मजबूत ठेवा. कारण शाब्बासकी किंवा धोका पाठीमागूनच मिळणार असतो.माणसाने नोकरीत असतांना घमेंडीत एवढे उडू नये.की एक दिवस सेवा निवृती नंतर समाजात म्हणजेच जमिनीवरच पाय व पाठ ठेवायची असते हे विसरु नये.सगळ्यात सुंदर नातं हे डोळ्यांचे असते.एकत्र मिटतात,उघडतात,रडतात आणि एकत्र झोपतात पण एकमेकांना न पाहता.नातं हे हात आणि डोळ्यांप्रमाणेपण असावं. कारण हाताला लागलं की डोळ्यात पाणी येतं आणि डोळ्यात पाणी आलं तर हात डोळे पुसतात.एकदा हाताने पायांना विचारले, तुझ्यावर सगळे डोके ठेवतात तो अधिकार मला का नाही,त्यावर पाय हसून म्हणाले यासाठी जमिनीवर असावं लागतं,हवेत नाही.दुःखात बोटं अश्रू पुसतात तर आनंदात तीच बोटं टाळ्या वाजवतात,आपले अवयवच असे वागतात तर दुनियेकडून काय अपेक्षा ठेवायची.जगातील सुंदर जोडी म्हणजे अश्रू आणि हास्य पण ते एकत्र कधीच नसतात,पण जेव्हा एकत्र येतात तो सगळ्यात सुंदर क्षण असतो.एकदा देवाच्या पायावरची फुले गळ्यातील फुलांना म्हणाली, तुम्ही असं कोणतं पुण्य केलं म्हणून देवाच्या गळ्यात आहात? त्यावर हारातील फुले म्हणाली त्यासाठी काळजात सुई टोचून घ्यावी लागते.कान नावाचा घातक अवयव जे ऐकतो तेच डोळ्यांना बघायला लावतो.या जगात चपलेशिवाय योग्य जोडीदार कोणीच नाही. कारण एक हरवली की दुसऱ्याचं जीवन तिथेच संपते.दुरावा कोणतंही नातं संपवत नाही आणि जवळीक कोणतंही नातं घट्ट करत नाही.तर नात्यांची घेतलेली काळजी आणि केलेला सन्मान यामुळे नातं अधिक मजबूत होतं,नात ते टिकतं ज्यात शब्द कमी आणि समज जास्त असते,तक्रार कमी आणि प्रेम जास्त असते.अपेक्षा कमी आणि विश्वास जास्त असतो.

सेवानिवृती आणि म्हातारपणाची सर्व लक्षणे समजून घ्या आणि ठरवा कि तुम्ही किती म्हातारे झाला आहात.मित्र बोलावत आहेत परंतु तुम्हाला जावसं वाटत नसेल,तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.मस्त मौजमस्ती करणा–या लहान मुलांवर कारण नसताना चिडलात तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.रेडिओ वर सुमधूर गीतांचा कार्यक्रम चालू आहे आणि डोक्याला बाम लावावासा वाटत असेल तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.धमाल मस्तीचा सिनेमा सुरू आहे आणि तुम्ही टीका करायला सुरुवात करता तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.मस्त मजेत मैफिल चालू आहे आणि तुम्ही सल्ला द्यायला सुरुवात करता तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.नवीन कपडे खरेदी करायची इच्छा होत नसेल तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात. फुलांवर भ्रमर बघून रोमँटिक गीत आठवत नसेल तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात. नव तरूणांच्या कपड्यांवर वारंवार टिपण्या करीत असाल तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.रेस्टॉरंटमध्ये जाऊन घरच्या अन्नाची स्तुती करायला लागलात तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात. बेफिकीरी सोडून डोक्यावर चिंतेच्या टोपल्या ठेवायला लागलात तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.पावसात भिजायचा आनंद सोडून छत्री आठवत असेल तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.ग्रुप मधे आलेल्या सर्व पोस्टना कंटाळला असाल तर समजा तुम्ही म्हातारे झाला आहात.आणि सर्वात महत्वाचं म्हणजे तुम्ही ग्रुपवर कांहीच पोस्ट टाकत नसाल,तर तुम्ही नक्की म्हातारे झाला आहात !

*******

सागर रामभाऊ तायडे

९९२०४०३८५९,

भांडुप,मुंबई.

अनेक जन आंदोलनात ज्येष्ट नेत्या बरोबर आंदोलनातील आठवणीतील छायाचित्र माहिती साठी देत आहे.

# सरकारवर टीका म्हणजे नक्षलवाद नव्हे!

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची २४ ऑगस्ट २४ रोजी छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे नक्षलग्रस्त सात राज्यांतील अधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, ओदिशा, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक उपस्थित होते. बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, ‘नक्षलवादविरोधी लढाई अंतिम टप्प्यात असून मार्च २०२६ अखेर देशातून नक्षलवाद्यांच्या नायनाट केला जाईल. नक्षलवादाची समस्या गंभीर आहे. त्यामुळे नक्षलवाद संपविण्यासाठी कठोर कारवाई केली जाईल. लोकशाहीला नक्षलवाद्यांचा मोठा धोका आहे. गेल्या चार वर्षांत नक्षलवाद्यांमुळे १७ हजारांहून अधिक लोकांचा बळी गेला आहे. त्यामुळे त्यांचा बीमोड करण्यासाठी केंद्र सरकारने कठोर पावले टाकण्यास सुरुवात केली आहे.’ नक्षलवादाचा बीमोड हा खरंच अतिशय महत्त्वाचा गंभीर विषय आहे. केंद्रीय गृहमंत्री आगामी दीड वर्षात त्याचा बिमोड करू असे म्हणतात हे स्वागतार्ह आहे. मात्र त्यासाठी नक्षलवादाचा इतिहास लक्षात घेऊन त्याचे योग्य प्रकारे निर्दालन करण्यासाठी फार कठोर पावले उचलावी लागतील आणि योग्य प्रकारे नियोजनही करावे लागेल.

नक्षलवाद्यांचे हल्ले आणि त्यातून होणारी मोठी हानी हा गेल्या अनेक दशकांपासून चिंतेचा विषय आहे. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अनेक जवान, नेते, सर्वसामान्य नागरिक बळी गेले आहेत. मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी प्रमाणेच वित्तहानीही झाली आहे. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना केंद्र सरकारने ६ जून २००९ रोजी नक्षलवादविरोधी धोरणाचा १४ कलमी मसुदाही तयार केला होता. पण अंमलबजावणीच्या दृष्टीने तो तकलादू ठरला. गेल्या दहा वर्षांत विद्यमान केंद्र सरकारनेही फार मोठे यश मिळवले आहे असे दिसत नाही.

नक्षलवादाबाबतचा सरकारी दृष्टिकोन अभ्यासपूर्ण नाही हे आजवर वारंवार स्पष्ट झाले आहे. अनेकदा तर परिवर्तनवादी पुरोगामी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचीही नावे चक्क नक्षलवाद्यांच्या यादीत समाविष्ट झाल्याचे दिसून आले होते. मानवतावादी संघटना नक्षलवाद विरोधाची धार बोथट करतात असाही आरोप काही राजकारण्यांनी केला. अर्थात अलीकडे सामाजिक, परिवर्तनवादी संस्था –संघटनांमध्ये सक्रिय राहून शहरी भागातही आपले बस्तान बसवायचे नक्षलवाद्यांचे प्रयत्न नाकारता येत नाहीत. हे खरे असले तरी नक्षलवादी कुणाला म्हणायचे याबाबत सरकारी यंत्रणा संभ्रमात आहे, हे वारंवार दिसून आले आहे. शासनाच्या धोरणांवर टीका करणारा, डावा पुरोगामी विचार मांडणारा, सर्वांगीण विषमता नष्ट झाली पाहिजे असे म्हणणारा जो कोणी असेल तो नक्षलवादी आहे असे जर शासन मानणार असेल तर बहुसंख्य जनतेलाच नक्षलवादी म्हणावे लागेल. नक्षलवाद हा घटनाविरोधी आहे. देशाला त्यापासून धोका आहे. त्याचा बीमोड झालाच पाहिजे यात शंका नाही. पण त्यासाठी नक्षलवाद म्हणजे नेमके काय हे समजूनही घेतले पाहिजे. १९६७ साली दार्जीलिंग जिल्ह्यातील नक्षलबाडी या गावी माओवाद्यांनी सशस्त्र उठाव करण्याचा प्रयत्न केला. असा उठाव देशात इतरही काही ठिकाणी झाला. पण पहिला उठाव नक्षलबाडी या गावी झाला म्हणून या चळवळीला नक्षलवादी चळवळ हे नाव पडले. चीन व रशिया यांच्यातील वाद १९६३ साली विकोपाला गेला. परिणामी आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत फूट पडली. १९६४ साली भारतातही कम्युनिस्ट चळवळीत आणि पक्षात फूट पडली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट असे दोन पक्ष स्वतंत्र झाले. भारताच्या सरकारचे वर्गस्वरूप नेमके कोणते यावर मुख्य मतभेद झाले. त्यावर लोकशाही क्रांतीचा मार्ग चोखाळण्यात भारताच्या वास्तवाच्या संदर्भातील रणनीती त्यांनी ठरवली. त्यामध्ये मार्क्सवादी पक्ष डावीकडे झुकलेला असल्याने अतिडाव्या विचारांच्या नक्षलवाद्यांनी त्यात सहभाग दाखवला. परंतु त्यांची भूमिका न पटल्याने नक्षलवाद्यांनी त्यातून बाहेर पडून स्वतःची वेगळी रणनीती तयार केली. त्यातून नक्षलवाद्यांच्या अमानूष कारवाया सुरू झाल्या. व्यवस्था बदलायचे नाव घेत अराजक निर्माण करण्याचे काम त्यांनी हिंसेच्या माध्यमातून सुरू केले.

चारू मजुमदार यांनी नक्षलवादी चळवळीची उभारणी केली. या मंडळींनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणांवर आणि विचारांवर कडाडून टीका केली. पीपल्स वॉर म्हणजे लोकयुद्धाची कल्पना मांडून भारतात सशस्त्र क्रांती केली पाहिजे, अशी भूमिका घेतली. त्या आधारे काही उठावही केले पण ते मोडून काढले गेले. गेल्या ५५ वर्षांत नक्षलवाद्यांनी ग्रामीण आदिवासी भागांत आपले तळ ठोकण्याचे काम पद्धतशीर केले. शेतकरी वर्ग हा मुख्य स्रोत समजून कामगारांच्या नेतृत्वाखाली खेड्यांनी शहरांवर कब्जा करायचा, कारण शहरे भांडवलशाही व साम्राज्यशाहीची केंद्र आहेत ही त्यांची भूमिका आहे. सरंजामशाही आणि सर्वसामान्य जनता यांच्यातील वर्ग विरोध हा भारतातील प्रमुख आंतरविरोध मानून नक्षलवादी धोरणे मांडतात. त्यात अनेक वैचारिक कच्चे दुवे आहेत. त्यामुळे नक्षलवाद्यांना सर्वसामान्य जनतेत स्थान नाही हे वास्तव आहे.

त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की चारू मजुमदार आणि कन्नू संथाल यांची नक्षलवादी भूमिका आणि आजचा नक्षलवाद यात बराच फरक पडला आहे. आजचा नक्षलवाद हा हिंसाचारी, लुटारू, खुनशी, बेबंद आहे. देशविरोधी शक्ती आणि दहशतवादी संघटनांचे साटेलोटे आहे. शस्त्रास्त्रे, अमली पदार्थ, वन्य प्राण्यांचे अवयव यांची तस्करी आणि नक्षलवादी यांचे नाते घट्ट आहे. नक्षलवादी सर्व प्रकारची आधुनिक साधने वापरतात. गोरगरीब जनता, सरकार, बडे उद्योगपती यांना लुटून, भ्रष्टाचार करून, दहशत निर्माण करू नक्षलवादी समतेची चर्चा करत ऐशरामी, मोहमयी जीवन जगत आहेत. त्यांच्या क्रूरपणाच्या कारवाया आणि भोगवादाच्या कहाण्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. म्हणूनच त्यांच्या बीमोड करण्यासाठी जे जे करावे लागेल ते अग्रक्रमाने करण्याची गरज आहे.

नक्षलवाद्यांकडे अत्याधुनिक शास्त्रे आहेत. त्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. खाणी आणि कंत्राटदार यांच्याकडून त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक बळ मिळत आहे. सरकारला नक्षलवादाशी लढा देताना नवी रणनीती आखावी लागेल. यंत्रणेत सुधारणा करावी लागेल. कायद्यात बदल करावे लागतील. नक्षलग्रस्त भागांच्या विकास कार्यक्रमांवर तातडीने भर द्यावा लागेल. केवळ जवानांची कुमक वाढवून हा प्रश्न सुटणार नाही.

नक्षलवादाचा निपा:त करायचा असेल तर आक्रमक आणि परिणामकारक पावले उचलावी लागतील. नक्षलग्रस्त भागात सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, संरक्षण आदी विविधांगी उपाय योजना केल्या पाहिजेत. नक्षलवाद ही प्रामुख्याने सामाजिक व आर्थिक समस्या आहे. त्यामुळे जमिनीची मालकी व जमीनविषयक सुधारणांना अग्रक्रम देण्याची गरज आहे. जनकल्याणाचे काम करणाऱ्या त्या भागातील सामाजिक संस्थांना सरकारने प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याची गरज आहे. पोलीस आणि प्रशासन यंत्रणेतील पारंपरिक बाबी बदलून अमूलाग्र सुधारणांना प्राधान्य दिले पाहिजे. विकासानेच हे प्रश्न संपतील, हे खरे आहे. पण आज निष्पाप माणसांच्या जीवावर उठलेल्या नक्षलवादाला सुरक्षा व्यवस्थेच्या आधारे संपवावे लागणार आहे. प्रशासकीय सुधारणा होऊ नयेत, त्यांचे लाभ सर्वसामान्यांना मिळूच नयेत यासाठी नक्षलवादी झटत आहेत. यातच त्यांची स्वतःशी केलेली प्रतारणा आहे. हा लोकांशी केलेला द्रोह आहे. हे सारे लक्षात घेऊन नक्षलवादाची लढाई लढावी लागेल. सरकारच्या आश्वासनांपेक्षा कृती महत्त्वाची ठरणार आहे. नक्षलवाद संपवण्यासाठी योग्य त्या साऱ्या कृती घडोत ही अपेक्षा.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमीत्ताने आयोजीत विविध उपक्रमास जेष्टांचाही सहभाग

लातूर :- महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्मीती करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी मेजर ध्यानचंद (हॉकीचे खेळाडू) यांचा दि. २९ ऑगस्ट हा जन्मदिन क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो.







राज्यामध्ये क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा , शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळाचे महत्व पोहोचविणे, निरोगी राहण्याचा संदेश जावा, युवक-युवतीमध्ये क्रीडा विषयक वातावरण निर्माण व्हावे, क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे यासाठी लातूर जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर मार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. दि.२७ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजीत विविध उपक्रमाअंतर्गत जिल्हा क्रीडा संकुलामध्ये नियमीत सरावासाठी येणाऱ्या खेळाडू , क्रीडा प्रेमी , महिला तसेच जेष्ठ नागरीकांनी ही सहभाग नोंदवला. याप्रसंगी ओन्ली ग्राऊंड कट्टा या गृपचे बाळकृष्ण धायगुडे, भगवंत सोनवणे, भारत काळे, सय्यद ए.आर., सोमनाथ महाजन, उदय चामले, डॉ.विश्वनाथ साखरे, स्वयंप्रकाश गोस्वामी, फारुकी अहमद, मधुकर पाटील, एस.एम. राचट्टे, राजशेखर बीरादार, बालाजी शिंगडे,सिताराम जाधव, रवींद्र कुलकर्णी, चंद्रकांत धायगुडे, रामलींग ढोले, संजय पाटील, गौतम कांबळे आणि झुंबा क्लासच्या महिला श्रीमती नवनीता उत्सुर्गे, सुनंद चव्हाण, संजीवनी साळुंके, रुपाली तट, मिनाक्षी राऊत, सिमा माने, प्रणीता उटगे, मंदाकीनी मानकर, धनश्री पाटील आदी महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयाचे क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे, धीरज बावणे, क्रीडा मार्गदर्शक अरवींद चव्हाण यांनी केले.

## सणाची सुरुवात गोडाने करा, घरी बनवा चवदार गाजराची बर्फी, पारंपरिक रेसिपी नोट करा

सणसमारंभ असलं की आपल्याकडे गोडाचे पदार्थ आवर्जून बनवले जातात. कोणत्याही चांगल्या प्रसंगी गोड पदार्थाने आपले तोंड गोड करण्याची आपली फार जुनी संस्कृती आहे. आता लवकरच गणपती बाप्पा आपल्या सर्वांच्या भेटीला येणार आहेत. या गोड सणानिमित्त तुम्ही घरी काहीतरी गोड बनवण्याचा विचार करत असाल तर तुम्ही गाजराच्या बर्फीचा विचार करू शकता. गाजर आरोग्यासाठी फार फायदेशीर असतो. सध्या पावसाळा ऋतू सुरु आहे या ऋतूत गाजर बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. अशात हा पदार्थ देवाच्या प्रसादासाठी एक उत्तम पर्याय ठरेल. गाजराचा हलवा तर तुम्ही अनेकदा बनवून खाल्ला असेल मात्र यावेळी गाजराची चविष्ट बर्फी बनवून पहा. ही बर्फी घरातील सर्वांनाच फार आवडेल. जाणून घ्या यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य १/२ किलो किसलेले गाजर १ कप साखर १ कप दुध १/२ कप बारीक रवा १/२ कप मिल्क पावडर १/२ चमचा वेलची पूड सुक्यामेव्याचे काप आवडीनुसार तूप इन सर्दियों बनाकर खाएं सबसे आसान और डिलीशियस गाजर सूजी की बर्फी कृती गाजराची बर्फी बनवण्यासाठी सर्वप्रथम गाजर स्वछ पाण्याने धुवा आणि याची साल काढून घ्या यानंतर गाजर नीट किसून घ्या आता गॅसवर एक कढई ठेवा आणि यात तूप टाका यानंतर या तुपात रवा टाका आणि मंद आचेवर खमंग वास येईपर्यंत परतून घ्या आणि मग एका प्लेटीत काढून घ्या आता पुन्हा एक कढई गॅसवर ठेवा आणि यात तूप टाका यानंतर यात गाजराचा किस घाला आणि मंद आचेवर परतत रहा, याला छान सात,आठ मिनीटे परतुन छान वाफ येऊ द्या आता यामध्ये दूध घालुन, पुर्ण दुध आटेपर्यंत शिजु द्या नंतर यात साखर घाला आणि साखर विसरघळली की यात भाजेलेला रवा, मिल्क पावडर घाला आणि मिक्स करा मंद आचेवर सर्व साहित्य नीट शिजू द्या, छान एकत्र घट्ट होऊ द्या शेवटी यात वेलची पूड घाला आणि नीट एकजीव करा आता एका ताटात तूप टाकून ग्रिसींग घ्या आणि यात तयार मिश्रण टाकून नीट पसरवून घ्या यांनतर यावर सुक्या मेव्याचे काप पसरवा आणि थंड होण्यासाठी फ्रिजमध्ये ठेवून द्या काही तासांनी फ्रिजमधून याला काढा आणि याच्या वड्या पाडून घ्या अशाप्रकारे तुमची चवदार गाजराची बर्फी तयार होईल

## तुर्भे नाका येथील बसस्टॉप (बसथांबा) पूर्वी होता त्याच ठिकाणी राहावे वंचितच्या वतीने मनपा आयुक्त यांना दिले निवेदन


नवी मुंबई / के. एच. हनवते :- वंचित बहुजन आघाडी यांच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त व परिवहन अधिकारी, नवी मुंबई पोलीस आयुक्त आणि वाहतूक पोलीस उपायुक्त, सहाय्यक आयुक्त डी विभाग तुर्भे यांना वंचित बहुजन आघाडी शिष्टमंडळाच्या वतीने निवेदन देण्यात आले. तुर्भे नाका येथील बस स्टॉप (बसथांबा ) पूर्वी होता त्या ठिकाणीच लावण्या बाबत वारंवार जनतेच्या वतीने विनंती करण्यात येत आसुन तुर्भे नाका येथे रॉयल ओक या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन बस स्टॉप (बसस्थानक)



पूर्वीपासून या ठिकाणी होते पण आता नवीन कॉल सेंटर मोठे मोठे रेस्टॉरंट बार लॉजिंग बोर्ड असे या ठिकाणी नवीन व्यवसाय चालू झाल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाने बस थांबा तुर्भे नाक्यावरुन हाळु हाळु पुढे सरकवले जात आहे कारण या बस स्टॉप मुळे कॉल सेंटर लॉजिंग बोर्ड रेस्टॉरंट बार यांना अडचण होत असल्यामुळे बस स्टॉप पुढे सरकवण्यात येत आहे त्यामध्ये हॉटेल मालकाचे हित जोपासले जात आहे परंतू शाळेत येणारे जाणाऱ्या लहान मुलांना व वयस्कर वृद्धांना व महिलांना बस पकडण्यासाठी ट्राफिक पोलीस चौकी ब्रिज पर्यंत चालत जावे लागते रात्रीच्या वेळी उशिरा येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवाशांना पाकीटमार गरदुले बेवडे यांच्यापासून धोका निर्माण होतो आहे कारण तो बसस्टॉप लांब असल्यामुळे चालत जाते वेळी परिसरात शांतता असते त्यामुळेच या ठिकाणी पाकीटमार प्रवाशांना लुटण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेचे परिवहन बस स्टॉप पूर्वीच्या गजबजल्या जागेवर बसवण्यात यावे नवी मुंबई महानगरपालिका परिवहन बस स्टॉप गोल्डन ओक या रेस्टॉरंटच्या समोर बसवण्यात यावे यामुळे लोकवस्ती असलेले ठिकाणे हनुमान नगर, तुर्भे नाका, आंबेडकर नगर, गणेश नगर, इंदिरानगर येथून येणाऱ्या सर्व प्रवाशांना तुर्भे या बस स्टॉपचा फायदा होईल. (ब्रीजच्या जवळपास) बस स्टॉप असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे व रात्रीच्या वेळी लुटमार करणाऱ्यांचे प्रमाण जास्तीच वाढले आहे. म्हणून आयुक्त साहेब परिवहन अधिकाऱ्यांना विनंती आहे की, महानगरपालिकेचे बस स्टॉप तुर्भे नाक्यावर गोल्डन ओक या लॉजिंग चा समोर बदामाचे झाड आहे त्या ठिकाणी बसवण्यात यावे व प्रवाशांनचे गैरसोय या गोष्टी टाळावी यासाठी वंचित बहुजन आघाडीचे शिष्टमंडळ ज्येष्ठ नेते राजाभाऊ बनसोडे तुर्भे विभाग, एडवोकेट दिनेश फुटके, बेलापूर तालुक्याचे मा. सहसचिव शंकर बनसोडे, वंचित बहुजन आघाडीचे नवी मुंबई शहर उपाध्यक्ष संजय जवादे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. लवकरात लवकर मागण्या मान्य झाले नाही तर पक्षाचा वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराच देण्यात अला.

## पिगमेंटेशनमुळे खराब झालेले त्वचेचे सौंदर्य पुन्हा उजळवण्यासाठी 'हे' पदार्थ वापरा, त्वचा दिसेल आकर्षक

चमकदार आणि गोऱ्यापान त्वचेवर पिंपल्स किंवा पिगमेंटेशनचे काळे डाग आल्यानंतर चेहऱ्याचे सौंदर्य खराब होऊन जाते. महिलांच्या शरीरात सातत्याने बदल होत असतात. हे बदल कधी आरोग्यसंबंधित असतात, तर कधी त्वचा आणि केसांशी निगडित असतात. शरीरात होणाऱ्या बदलांचे परिणाम त्वचेवर दिसून आल्यानंतर चेहरा पूर्णपणे खराब होऊन जातो. सूर्यप्रकाश, हार्मोनल बदल, गर्भधारणा, त्वचेची काळजी न घेणे, चुकीचा आहार घेणे इत्यादी गोष्टींमुळे चेहरा खराब होऊन जातो. शरीरात होणाऱ्या हार्मोनल बदलांमुळे पिगमेंटेशनची समस्या वाढत जाते. चेहऱ्यावर आलेले पिगमेंटेशन घालवण्यासाठी अनेक महिला बाजार मिळणाऱ्या महागड्या क्रीम्स किंवा इतर प्रॉडक्ट वापरतात. पण याचा फारसा परिणाम दिसून येत नाही. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला चेहऱ्यावरील पिगमेंटेशन घालवण्यासाठी कोणते घरगुती उपाय करावे, जाणून घेऊया.दही: शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी अनेक लोक नियमित दही खातात. दह्यामध्ये असलेले गुणधर्म शरीराला थंडावा देतात. उष्णतेमुळे चेहऱ्यावर आलेले पिंपल्स आणि पिगमेंटेशन घालवण्यासाठी दह्याचा वापर करा. दह्यामध्ये असलेले गुणधर्मांमुळे त्वचा नैसर्गिकरित्या उजळण्यास मदत होते. दह्यात असलेले लॅक्टिक





ॲसिड त्वचेवर जमा झालेला मेलीनीनचा थर कमी करून त्वचा उजळवण्यासाठी मदत करते. तसेच त्वचेला दही लावल्यामुळे त्वचा मऊ आणि गुळगुळीत होते. शरीराला हायड्रेट करण्यासाठी नियमित अर्धा वाटी दही खावे.

काकडी: काकडीमध्ये पाण्याचे प्रमाण भरपूर असते. काकडीमध्ये नैसर्गिक थंडावा असतो. उष्णतेमुळे खराब झालेली त्वचा पुन्हा उजळवण्यासाठी काकडीचा वापर करा. काकडीचा रस किंवा किसलेली काकडी त्वचेवर लावल्यामुळे त्वचेमधील आर्द्रता टिकून राहते आणि चेहऱ्यावरील काळेपणा कमी होतो. काकडीमध्ये असलेले अँटीऍक्सीडेन्टमुळे त्वचेवर सुरकुत्या येत नाहीत. फेसपॅकचे फायदे: चेहऱ्यावर महागड्या आणि केमिकल युक्त क्रीम्स लावण्यापेक्षा घरगुती पदार्थांचा वापर करावा.

# पावसाळ्यात कढवून आटवलेले पाणीच का प्यावे?

'वारुणवारे म्हणजे वरुण या जलदेवतेच्या नावाने ओळखले जाणारे वारे. पश्चिमेकडून वाहत येणार्या या वारुणवाऱ्यांनी ढगांना सोबत खेचून आणल्याने आकाश ढगांनी भरून जाते. आकाशाचा रंग काळा-निळा होतो व आकाश मळलेले दिसू लागते. आकाशातले हे ढग जेव्हा गडगडाट करू लागतात, कडकडाटासह वीज चमकू लागते तेव्हा गर्जना करत पावसाच्या धारा बरसू लागतात. अशा या पावसात पाणीच पाणी चोहिकडे असे असले तरी आपण पिण्याच्या पाण्याचे नेमके काय करावे, ते समजून घेऊ!

क्वथितं अम्बु पिबेत आषाढामध्ये पावसाची वृष्टी हळूहळू वाढत जाते व नद्या पाण्याने भरू लागतात. नद्यांच्या किनाऱ्यांवरुन पाणी वर- वर चढू लागते आणि नद्यांचे किनारे हळूहळू दिसेनासे होतात. पावसाचा वर्षाव जसजसा वाढत जातो, तसतशा नद्या सागराचे रूप धारण करतात आणि 'हीच का ती कालपर्यंत शांतपणे वाहाणारी नदी', असे वाटू लागते. यानंतर पाणी कोणते आणि भूमी कोणती हे समजेनासे होते अर्थात सर्व भाग जलमय होतो. माती आणि पाणी एकत्र झाल्याने ते पाणी पिण्यालायक राहात नाही, म्हणूनच या दिवसांत पाणी उकळवून- गाळून प्यावे. क्वथितं अम्बु पिबेत्च्च (अष्टाङ्गसंग्रह १.४.४५) वाचकहो, हे आहे 'अष्टाङ्गसंग्रह' या आयुर्वेदीय ग्रंथामधील वर्णन! हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या आयुर्वेद-शास्त्रामधील हे वर्णन आज २१व्या शतकातही प्रत्यक्षसिद्ध आहे.


पाणी उकळवूनच प्या हल्ली अतिवृष्टी झाल्याने गावागावांमध्ये होणारी परिस्थिती वरील वर्णनाला तंतोतंत लागू पडते! वास्तवातही पावसाळ्यात शहरांमध्येही अनेक ठिकाणी गढूळ पाणी येऊ लागते, मग गावांकडची स्थिती काय असेल? पाण्याला गढूळपणा नसला तरीही पावसातल्या पहिल्या काही दिवसांमध्ये तरी पाणी पिण्यालायक राहात नाही, हे सत्य आहे. मथितार्थ हाच की पावसाळ्यात पाणी गाळून व सर्वात महत्त्वाचे म्हणजे उकळवून मगच प्या. पाणी उकळवून पिण्याचा हा शास्त्राने दिलेला सल्ला आजही प्रत्यक्षसिद्ध आहेच, जो आधुनिक वैद्यकही २१व्या शतकामध्ये देते. आयुर्वेदाने मात्र याही पुढे जाऊन पाणी आटवण्याच्या संदर्भात अधिक मार्गदर्शन केले आहे. किती प्रमाणात आटवलेले पाणी कोणत्या गुणांचे व कोणत्या रोगांमध्ये उपकारक याविषयी आयुर्वेदाने केलेला अभ्यास आश्चर्यकारक व उपयुक्त आहे.


पावसाळ्यात पाणी नेमके किती उकळवावे? पावसाळ्यात पाणी नेमके किती उकळवावे, याबाबत दोन प्रकारे मार्गदर्शन करता येईल. ज्या प्रदेशामधील पाणी हे विविध अशुद्धींनी दूषित झालेले असते, त्या प्रदेशामध्ये पाणी जितके उकळवू तितके आरोग्यास हितकारक असल्याने एक अष्टमांश बाकी राहीपर्यंत उकळवावे. त्यादृष्टीने प्रावृट् ऋतू मध्ये (म्हणजे पावसाळ्याचे आरंभीचे काही आठवडे) पाणी एक अष्टमांश होईपर्यंत आटवणे अधिक योग्य, जो सल्ला १६व्या शतकात लिहिल्या गेलेल्या भावप्रकाश या आयुर्वेदीय ग्रंथामध्ये दिलेला आहे. अन्यथा पाऊस सुरु होऊन काही आठवडे झाल्यानंतर जेव्हा नद्यांचे पाणी वेगाने वाहू लागते आणि अशुद्धी सुद्धा वाहून जातात तेव्हा पाणी निम्मे होईपर्यंत आटवावे. आयुर्वेदानुसार उकळवून आटवलेले असे कोमट पाणी प्यायल्यास ते पाऊण तासात पचते. अर्धे पाणी बाकी राहीपर्यंत आटवलेल्या पाण्याचा विशेष गुण म्हणजे ते वातनाशक असते. वर्षा ऋतुमधील वातप्रकोपाचा व वातविकृतींचा विचार करता अशाप्रकारे निम्मे आटवलेले पाणी वापरल्यास ते या दिवसांमध्ये संभवणार्या वातविकारावर नियंत्रण ठेवण्यास हितकारक होईल.

कोष्ण (कोमट) जलपानाचे आरोग्याला फायदे- (सुश्रुतसंहिता १.४६.३९,४०) १) गरम पाणी हे चवीला गोड व पचायला हलके असते. २) गरम पाणी शरीराला थंडावा देणारे मात्र तरीही कफशामक (कफ कमी करणारे) असते. त्यामुळे कफविकारांमध्ये व श्वसनविकारांमध्ये ते उपयोगी पडते. ३) सर्दीमुळे नाक वाहत असताना थंड किंवा साधे (जे पावसाळ्यात थंडच असते) पाणी पिण्यात आले तर नाक वाहाणे चालूच राहते, मात्र रुग्णाने कोमट (विशेषतः आटवलेले)पाणी पिण्यास सुरुवात केल्यास सर्दी नियंत्रणात येते. खोकला व दमा या आजारांमध्ये तर सातत्याने प्यायलेले गरम पाणी रुग्णाला बराच आराम देते. ४) गरम पाणी अग्नीप्रदिपक (भूक व पचनशक्ती सुधारणारे) असते, त्यामुळे अग्निमांद्य असताना व विविध पचनसंस्थेच्या आजारांमध्ये उपयोगी पडते. ५) भूक मंदावलेल्या रुग्णाने कोमट पाणी प्यायल्यास पाचक स्राव व्यवस्थित स्रवून भूक वाढून पचन सुधारण्यास साहाय्य होते, याउलट थंड पाण्यामुळे पाचक स्रावाचे स्रवण करणार्या सूक्ष्म स्रोत- मुखांचे संकोचन होऊन अग्नी मंदावण्याची शक्यता असते. ६) अपचनाच्या रुग्णांना साधे पाणी प्यायल्यावर पोटात गुबारा धरतो, तर कोमट पाणी मात्र पचन सुधारते. ७) जुलाब होत असतानाही कोमट पाण्यामुळे जुलाब थांबण्यास साहाय्य होते. ८) गरम पाणी हे वातशामक आहे. थंड पाणी प्यायल्यानंतर सांध्याच्या वेदना वाढतात, तर कोमट पाणी वेदना कमी करण्यास मदत करते. वातविकारांचा त्रास थंड पाणी प्यायल्यामुळे बळावतो, हे रुग्ण नेहमीच सांगतात. ९) गरम पाणी हे बस्ती म्हणजे मूत्राशयाची शुद्धी करते अर्थात मूत्रविसर्जन सुधारते व लघवी साफ होऊ लागते. १०) स्थूलत्व आणि थंड पाण्याचा संबंध तर ढग आणि पाण्यासारखा आहे. ढगामध्ये जितके जास्त पाणी तितका ढग अधिक जड, त्याचप्रमाणे शरीरामध्ये जितके जास्त पाणी तितके शरीर अधिक जड व स्थूल. सहसा वजनदार शरीराच्या स्थूल व्यक्ती थंड पाणी पिणेच पसंत करतात. इतकंच नव्हे तर एखाद्या ग्लासने त्यांची तहान शमत नाही, निदान एक बाटली गार पाणी त्यांना प्यावे लागते. याच स्थूलांना कोमट पाणी प्यायची सवय लावली तर त्यांच्या शरीरावरील मेद कमी होण्यास साहाय्य होते. कारण चरबी घटवण्यामध्ये गरम पाणी औषधासारखे उपयोगी पडते. कोमट पाण्याचाच फायदा वरील सर्व विकाराच्या रुग्णांना त्या आजाराची लक्षणे सुरू होऊ नयेत म्हणून किंवा लक्षणे सुरू झाली असतील तर त्वरित नियंत्रणात यावी म्हणून कोष्ण (कोमट) पाणी पिण्याचा चांगला फायदा होताना दिसतो. एकंदरच कोमट पाणी हे विविध रोगांमध्ये एक उत्तम पथ्य आहे व आरोग्यासाठी हितकर आहे. थोडक्यात आरोग्य-सल्ला हाच की शक्यतो वर्षभर कोमट पाणी पिणे हितावह, त्यातही पावसाळ्यात तर कढवून आटवलेले असे कोमट पाणी प्यायले पाहिजे.

## लांब केसांसाठी आवळ्यामध्ये मिक्स करा 'हे' पदार्थ, झपाट्याने होईल केसांची वाढ

केसांचे सौंदर्य वाढवण्यासाठी आवळा हे फळ अतिशय गुणकारी आहे. चवीला तुरट असलेल्या आवळ्याचे सेवन केल्यामुळे केसांसह आरोग्यालासुद्धा फायदे होतात. केसांच्या लांबलचक वाढीसाठी अनेक महिला केसांना बाजारात मिळणाऱ्या महागड्या क्रीम्स आणि केमिकल ट्रीटमेंट करतात. पण केसांवर





हानिकारक रसायन लावल्यामुळे केसांची वाढ पूर्णपणे थांबते आणि केस खराब होतात. खराब झालेले केस पुन्हा सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे आज माही तुम्हाला केसांच्या वाढीसाठी घरगुती पदार्थांचा वापर कसा करावा, याबद्दल सांगणार आहोत. घरगुती पदार्थ वापरल्यामुळे केसांची वाढ होऊन केसांचे नुकसान होत नाही.

केसांच्या मजबूत वाढीसाठी अनेक लोक नियमित एका आवळ्याचे सेवन करतात. आवळ्यामध्ये असलेले गुणधर्म केसांच्या वाढीस प्रभावी आहेत. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर किंवा रिकाम्या पोटी आवळ्याचे सेवन करावे. आवळ्यामध्ये मुबलक प्रमाणात विटामिन सी आणि इतर जीवनसत्वे आढळून येतात. तसेच यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, ज्यामुळे टाळूवरील कोंडा आणि इन्फेक्शन कमी होते. त्यामुळे केसांच्या घनदाट वाढीसाठी आवळ्यामध्ये हे पदार्थ मिक्स करून लावा.आवळा आणि कढीपत्त्याची पाने: केसांच्या वाढीसाठी आवळा आणि कढीपत्ता दोन्ही पदार्थ प्रभावी आहेत. यासाठी एका मिक्सरच्या भांड्यात कढीपत्त्याची पाने आणि आवळ्याचे तुकडे टाकून पेस्ट तयार करून घ्या. आवळे उपलब्ध नसल्यास तुम्ही त्यात आवळ्याची पावडर सुद्धा टाकू शकता. तयार केलेली पेस्ट टाळूवर आणि केसांच्या टोकांपर्यंत लावून कोरडी होण्यासाठी ठेवा. ३० मिनिटं झाल्यानंतर शॅम्पूचा वापर करून केस स्वच्छ धुवा. यामुळे टाळूवरील कोंडा निघून जाईल. कढीपत्यामध्ये भरपूर प्रथिने असतात, ज्यामुळे केसांची वाढ होते. आवळा आणि कांद्याचा रस: स्वयंपाक घरात जेवणाची चव वाढवणारा कांदा केसांसाठी अतिशय प्रभावी आहे. कांद्याचा रस केसांना लावल्यामुळे केस गळणे पूर्णपणे थांबते. यासाठी अर्धावाटी कांद्याचे तुकडे मिक्सरच्या भांड्यात घेऊन त्यात आवळ्याचे तुकडे टाका.

## श्रावणातील उपवासाला साखर गुळाचा वापर न करता बनवा अंजीरची खीर, आरोग्यासाठी ठरेल हेल्दी

श्रावण महिन्यात अनेक सण असतात. श्रावण महिना सुरु झाल्यानंतर सोमवारी आणि शनिवारी उपवास केला जातो. उपवास केल्यानंतर आरोग्याला अनेक फायदे होतात. उपवासाच्या दिवशी शंकराची मनोभावे पूजा केली जाते. तसेच काही दिवसांआधी नागपंचमी, रक्षाबंधन यांसारखे सण मोठ्या





उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आले. श्रावण महिन्यात सतत कोणते ना कोणते सण असल्यामुळे नेहमी काय गोड पदार्थ बनवावे, असा प्रश्न जर तुम्हाला पडला असेल तर ही रेसिपी नक्की बनवून पहा. अंजीराचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात. अंजीरमध्ये विटामिन ए, सी, ई, के, कॅल्शियम, पोटॅशियम, कॉपर तसेच अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म असतात. शरीरातील कमी झालेली ऊर्जा वाढवण्यासाठी आहारात अंजीराचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला साखर गुळाचा वापर न करता अंजीरचा खीर कशी बनवायची याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. येत्या श्रावणी शनिवारी अंजीरची खीर नक्की बनवून पहा.

साहित्य: सुखे अंजीर काजू बदाम दूध वेलची पावडर खजूर तूप भिजवलेले साबुदाणा केशर

कृती: अंजीर खीर बनवण्यासाठी सर्वप्रथम एका वाटीमध्ये साबुदाणे भिजत ठेवा. तसेच दुसऱ्या वाटीमध्ये अंजीर भिजवण्यासाठी ठेवा.

कढईमध्ये दूध गरम करण्यासाठी ठेवा. त्यानंतर दुधाला उकळी आल्यानंतर त्यात भिजवलेले साबुदाणे टाकून चमच्याने मिक्स करून घ्या. साबुदाणे व्यवस्थित शिजल्यानंतर त्यात बारीक केलेले काजू, बदाम आणि अंजीराचे तुकडे टाकून मिक्स करून घ्या.

नंतर त्यात दुधात भिजवलेले खजूर खीरमध्ये टाकून मिक्स करून घ्या. सगळ्यात शेवटी खीरमध्ये वेलची पावडर टाकून मिक्स करा.

तयार आहे साखर गुळाचा वापर न करता बनवलेली अंजीरची खीर.

# मानवी बुद्धिमत्तेशिवाय आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा विकास अशक्य -दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागातर्फे आयोजित २५ दिवसीय रोबोटिक्स कार्यशाळेचा समारोप





लातूर :- २१वे शतक विज्ञान-तंत्रज्ञान व संगणकाचे युग आहे.या युगात विद्यार्थ्यांनी पूर्वीच्या दिग्गज वैज्ञानिकांनी केलेले संशोधन,त्यांनी मांडलेल्या संकल्पना व सिद्धांताचा आदर्श जीवनात घ्यावा.अशा या नाविन्यपूर्ण संशोधनाचा उपयोग समाजासाठी केला पाहिजे.आज आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेला मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व असून बेसिक सायन्स व संगणकाचे जास्तीत-जास्त ज्ञान घेऊन त्या ज्ञानाचा उपयोग गाव,समाज आणि राष्ट्राच्या विकासासाठी केला पाहिजे.याचबरोबर जीवन आनंदी असावे व जीवनात सकारात्मक दृष्टिकोन असावा आणि याही पुढे जाऊन जीवन सुखकर व्हावे यासाठी प्रयत्नरत असावे आणि जीवन सुखकर करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर व त्याचा विकास होणे आवश्यक आहे,ही आजच्या विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने आहेत.कृत्रिम बुद्धिमत्ता कितीही विकसित झाली असली तरीही त्याला मानवी बुद्धिमत्तेचा स्पर्श असायलाच हवा,त्याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्तेला पूर्णत्वच येत नाही आणि म्हणूनच नवीन तंत्रज्ञानाच्या विकासात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करताना मानवी बुद्धिमत्तेचा सिंहाचा वाटा आहे,हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवायला हवे आणि त्याला अनुसरूनच संशोधन कार्य केले पाहिजे.दयानंदचा विद्यार्थी म्हणून संशोधनाबरोबरच संशोधनातले पेटंट मिळविणे,समाजोपयोगी प्रकल्प तयार करून स्वतःचा स्टार्टअप सुरू करणे यावरही लक्ष केंद्रित करायला हवे आणि या सर्व बाबींसाठी दयानंद शिक्षण संस्थेचा खंबीर पाठिंबा नेहमीच असेल,असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी केले.

लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या २५ दिवसीय रोबोटिक्स कार्यशाळेचा समारोप दि.२६ ऑगस्ट २०२४ झाला.यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर,दयानंद फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रोहिणी शिंदे,विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू,माजी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ललीत ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकातून डॉ.रोहिणी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर त्यांचे कौशल्य वाढीस लागावे या उद्देशातून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असे त्यांनी सांगितले तर आभार डॉ.संगीता जाजू यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.सुमित जोशी यांनी केले.आदिनाथ जाधव व गौरी जाजू या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतील अनुभव सांगितले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले.याप्रसंगी साधन व्यक्ती प्रा.प्रतीक मुसमाडे, प्रा.सुजाता काळे,प्रा.अरुणा चौधरी,प्रा.पूजा नंदगावे,प्रा. विजय पवार,प्रा.शहाजिया फरहिन,प्रा.कृष्णा सारडा, प्रा.आदित्य सूर्यवंशी,प्रा.दीपाली दाडगे,प्रा.वैभव कुलकर्णी, प्रा.आशा बोराडे,डॉ.रामशेट्टी शेटकार,प्रियंका हिप्परकर,राहुल बनभेरू,मानसी गायकवाड,छाया केसाळे,राजेसाहेब पांचाळ,हरिओम पाटोळे यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# ऑर्थोपेडिक असोसिएशनच्या सीएमईला उत्स्फूर्त प्रतिसाद





लातूर : संचेती हॉस्पिटल पुणे, महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन व लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सीएमईला अस्थिरोग तज्ज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सीएमईला ६५ ते ७० अस्थिरोग तज्ज्ञ डॉक्टर्सनी आपली उपस्थिती नोंदवली. लातूरच्या कार्निव्हल रिसॉर्टमध्ये पार पडलेल्या या अस्थिरोग तज्ज्ञांसाठीच्या मणक्याच्या विकारावरील एक दिवसीय कार्यशाळेचे उदघाटन खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संचेती हॉस्पिटलचे डॉ.सिद्धार्थ अय्यर, डॉ. शैलेश हदगावकर , डॉ.अपूर्व शिंपी, लातूर ऑर्थोपेडिक असो. चे अध्यक्ष व या कार्यशाळेचे संयोजक डॉ. अशोक पोद्दार, डॉ. संतोष माळी आदींची प्रमुख उपस्थिती होती. मणक्याचे आजार म्हणजे प्रामुख्याने मार लागणे, इजा होणे, वयोमानानुसार तथा जन्मतःच उदभवणाऱ्या मणक्याच्या विविध आजारांवर अद्यावत वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या उपयोगाने कशा पद्धतीने प्रभावी उपचार केले जाऊ शकतात, याविषयी शास्त्रोक्त मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी लातूरचे वैद्यकीय क्षेत्र अद्यावत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकामी आघाडीवर असल्याचे सांगितले. लातूरमध्ये सातत्याने अशा प्रकारच्या सीएमईचे आयोजन करण्यात येते व डॉ.अशोक पोद्दार प्राधान्याने अशा उपक्रमांसाठी आघाडीवर असल्याचे सांगून खा. डॉ. काळगे म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रात दिवसेंदिवस अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. त्यामुळे अद्यावत तंत्रज्ञान व यंत्रसामग्रीची माहिती , उपचार यंत्रणेची माहिती होण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांचे बायोजन नियमितरित्या होणे गरजेचे आहे. लातूरचे वैद्यकीय क्षेत्र खरोखर अद्यावत यंत्रणांनी सुसज्ज आहे. त्यामुळे लातूरमध्ये कोणत्याही असाध्य व्याधींवर चांगल्यात चांगले उपचार मिळतात, ही बाब निश्चितच वैद्यकीय क्षेत्रासाठी भूषणावह आहे. मणक्याच्या विकारावरील या एकदिवसीय कार्यशाळेत केवळ आपल्या देशातच नव्हे तर जगभरात चाललेल्या वैद्यकीय तंत्रज्ञानातील बदलाविषयी तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केली. यावेळी कार्यशाळेस उपस्थित अस्थिरोग तज्ज्ञांना मणक्याच्या विकारावरील शस्त्रक्रियांचे थेट प्रक्षेपणही दाखविण्यात आले. लातूर ऑर्थोपेडिक असो.चे अध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना लातुरात दर महिन्याला दोन सीमईच्या आयोजनासाठी आपण प्रयत्नशील असून यामाध्यमातून जिल्ह्यातील अस्थिरोग तज्ज्ञांना अद्यावत उपचार यंत्रणांबाबत परिपूर्ण ज्ञान उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे सांगितले. अशा कार्यशाळेसाठी बाहेरच्या तज्ज्ञ डॉक्टरांना पाचारण करून त्यांच्याकडून आपल्या सहकाऱ्यांना जास्तीत जास्त ज्ञान मिळवून देण्याचा आपला प्रयत्न असल्याचे डॉ. पोद्दार यांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठ ऑर्थोपेडिक सर्जन , महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनचे संस्थापक तथा स्पाईन सोसायटीचे संस्थापक सदस्य डॉ. के. व्ही. चौबल यांचे नुकतेच निधन झाल्याने ऑर्थो पेडिक असो.च्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यशाळेस डॉ. द्वारकादास तापडिया, डॉ. गिरीश कोरे, डॉ. राजेंद्र मालू, डॉ. बलशेटवार, डॉ. लामतुरे, डॉ. हाके पाटील, डॉ. तुषार पिंपळे, डॉ. अक्षर भोसले, डॉ. डॉ. राजकुमार दाताळ , डॉ. काझी यांच्यासह अंबाजोगाई, उमरगा, उदगीर, अहमदपूर, कळंब आदी ठिकाणचे अस्थिरोग तज्ज्ञ उपस्थित होते.

# अटल फाऊंडेशनच्या महाराष्ट्र प्रदेश महामंत्रीपदी दत्तात्रय जी परळकर यांची नियुक्ती

नवी दिल्ली:- अटल फाऊंडेशन, दिल्ली येथील संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती अपर्णा सिंह यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष गणेश राजे यांच्या सहीने समृध्द व्यापारचे संपादक दत्तात्रय जी परळकर यांची निवड करण्यात आली आहे. अटल फाऊंडेशन हे अटल अनाथाश्रम, अटल वृध्दाश्रम, अटल संस्कृतीची शाळा, अटल शेतकरी व्यवस्था, अटल हॉस्पिटल, अटल महिला सक्षमीकरण, अटल वृक्षारोपण, अटल शिक्षण, अटल सेवा, अटल स्वच्छ्ता मोहीम, अटल स्वावलंबन आशा एक ना अनेक मोहिमा राबवित असते. फाऊंडेशन हे सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने विविध उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी समर्पित एक गैर-सरकारी संस्था आहे, आमच्या विविध श्रेणीतील सेवा विविध क्षेत्रातील व्यक्ती, कुटुंबे आणि समुदायांच्या उन्नतीसाठी आम्ही कार्य करत आहेत.



या फाउंडेशनच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती अपर्णा सिंह आहेत. फाऊंडेशनची स्थापना १९ सप्टेंबर २०१८ करण्यात आली आहे. तेंव्हा पासून आजतागायत सामाजिक काम करण्यात कसलीही तडजोड फाऊंडेशन करत नाही. राष्ट्रीय उपाध्यक्ष अमोल श्रीराम कुल्थिया, सुनील यादव आहेत, राष्ट्रीय महामंत्री रमेशभाई भुतडा, बबली त्यागी हे आहेत, राष्ट्रीय मंत्री जयवीर सिंह, कुलदीप शर्मा तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश राजे हे आहेत. या निवडीबद्दल सर्वच स्तरातून दत्तात्रय जी परळकर यांचे अभिनंदन होत आहे.

# 'विचारवंतांनी सत्तेच्या नव्हे, सत्याचा बाजूने बोलायला हवे'- डॉ. डी. वाय. पाटील

आपल्या परंपरेत 'विद्वान सर्वत्र पूज्यते' म्हटले आहे. त्याची अनुभूती देणारा आजचा हा सोहळा आहे. विद्वान व विदुषींच्या परंपरेत गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या लेखन व ज्ञानसाधनेतून समाजाचे प्रबोधन करणारे हे चार ज्ञानवंत असून, त्यांचा सन्मान समाजाला नवी दिशा देणारा ठरेल. मानवी मूल्ये, अध्यात्मिक बैठक आणि समाजाचा सुसंस्कृतपणा टिकवून ठेवण्यासाठी असे कार्यक्रम उपयुक्त असतात. लिखाणातून सामान्य, उपेक्षित, दुर्लक्षित, शोषित, पीडित लोकांच्या वेदनांवर फुंकर घालण्याचे, त्यातून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम या दिग्गजांच्या हातून झाले आहे. आजच्या काळात अशा विचारवंतांची समाजाला मोठी गरज आहे.



पुणे :- स्वतःचे व स्वकीयांचे हित बाजूला ठेवून अखिल मानवजातीचा विचार करणारे लोक खरे विचारवंत असतात. नैतिक मूल्यांचे अधःपतन होत असताना, वैयक्तिक लालसेपोटी सामान्य माणसाच्या वेदनेचा विसर पडलेल्या या काळात मानवतेच्या व लोकशाहीच्या रक्षणासाठी विचारवंतांनी ठाम भूमिका घेत सत्तेच्या नव्हे, तर सत्य आणि मानवकल्याणाच्या बाजूने बोलायला हवे, असे परखड मत ज्ञानवंतांनी मांडले. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ पिंपरी आणि लोकशाहीसाठी समंजस संवाद यांच्यातर्फे 'ज्ञानवंतांचा सत्कार' सोहळा आयोजिला होता. सरस्वती सन्मानप्राप्त लेखक डॉ. शरणकुमार लिंबाळे, साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे, गांधी अभ्यासक प्राचार्य डॉ. विश्वास पाटील आणि लेखक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांचा सत्कार डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते उल्हास पवार होते. नवी पेठेतील पत्रकार भवनात झालेल्या सोहळ्यावेळी ज्येष्ठ पत्रकार संपादक अरुण खोरे उपस्थित होते.

डॉ. नागोराव कुंभार म्हणाले, सध्याचे सामाजिक वातावरण अस्वस्थ करणारे आहे. नैतिक मूल्यांची, समर्पित भावनेची घसरण होत आहे. अशा स्थितीत व्यक्तीचे अस्तित्व अर्थपूर्ण व परिपूर्ण होण्यासाठी केवळ शारीरिक नव्हे, तर मानवी मनाच्या गरजा पूर्ण व्हायला हव्यात. आजच्या आव्हानांना गांभीर्याने घेऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर प्रबोधन व्हावे. दुर्दैवाने, गेल्या १० वर्षात साहित्यिक, विचारवंतांनी ठोस भूमिका घेतली नाही. सत्य आणि ज्ञान यावर प्रेम करणारा समाज घडला, न्यायाची संकल्पना योग्यरित्या राबवली, तर अनेक समस्या सुटण्यास मदत होईल.

डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, गांधी विरुद्ध आंबेडकर हा वाद अलीकडच्या काळात रंगवला गेला. प्रत्यक्षात गांधी आणि आंबेडकर यांच्यातील संबंध खूप चांगले होते. मंत्रिमंडळात आंबेडकरांचा समावेश असो की, राज्यघटनेच्या निर्मितीत महत्वाचे स्थान असो, गांधींनी कायम आंबेडकरांच्या प्रतिभेचा सन्मान केला. त्यामुळे आजच्य काळात गांधी अधिक आंबेडकर हा विचार घेऊन काम करण्याची गरज आहे. यामध्ये विचारवंतांनी या दोन महात्म्यांचे, त्यांच्या विचारांचे अभिसरण कसे होईल, यावर भर दिला पाहिजे. प्रस्थापितांनी उपेक्षित, दुर्लक्षित घटकांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

डॉ. शरणकुमार लिंबाळे म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली. स्वाभिमान, हक्क, अधिकार व माणूसपणाची जाणीव करून देणारा हा माझा आदर्श आहे. त्यांनी दिलेल्या आरक्षणामुळेच मला शिकता आले. इथपर्यंत पोहोचण्यात लोकशाही, प्रगतशील हिंदू समाज यांचे योगदान आहे. आजचा हिंदू सनातनी हिंदू नाही. त्याचे बेगडीपण आपण ओळखायला हवे. अन्यायाविरुद्ध बोलायला हवे. सामाजिक बांधिलकीतून आपली लेखणी चालवायला हवी. भेदभावाच्या भिंती भेदून सर्वांना समान न्यायाची भूमिका लेखकांनी घेतली पाहिजे.

डॉ. विश्वास पाटील म्हणाले, महात्मा गांधी आणि पुणे शहराचे विशेष नाते आहे. बापू आणि बा अर्थात महात्मा गांधी आणि कस्तुरबा यांच्यातील समर्पित नाते आपल्या सर्वांसाठी प्रेरणा देणारे आहे. पैसा, ताकद आणि माध्यमे हाताशी असलेले सत्ताधारी बेचैन आहेत. निवडणूक, खुर्ची, स्वहित, सत्तेची लालसा याने त्यांना ग्रासलेले आहे. अशावेळी सत्याची, प्रेमाची आणि स्वाभिमानाची शक्ती जागृत ठेवण्याचे काम विचारवंतांना करावे लागेल. निर्भयता आणि विनम्रता या गोष्टी प्रत्येकाच्या मनात रुजवाव्या लागतील. वाकड्या वाटेने न जाता सरळमार्गी आयुष्य जगण्यावर भर द्यायला हवा.

अध्यक्षीय समारोपात उल्हास पवार म्हणाले की, अलीकडच्या काळात स्वयंघोषित विद्वान, कार्यसम्राटांचा सुळसुळाट वाढला आहे. मात्र, मानवतेचा, समाजाच्या कल्याणाचा विचार करणारी ही चार ज्ञानवंत मंडळी आहेत. प्रसिद्धीपराभिमुख राहून हे चौघेही आपले कार्य सातत्याने करत राहिले. विज्ञान युगात लोकशाही प्रगल्भ करण्याचे दायित्व आपल्यावर आहे. जाती-धर्मावर आधारित वाढत असलेले राजकारण चिंतेची बाब आहे. हे राजकारण विचार व विवेक शून्यतेकडे घेऊन जात आहे. महापुरुषांची हत्या करणाऱ्यांचे उदात्तीकरण गंभीर गोष्ट आहे. संकुचित विचारांवर प्रहार करण्याची भूमिका विचारवंतांनी घ्यावी. मराठीतील अग्रणी लेखक, कवी असलेल्या लिंबाळे यांनी सनातन, अक्करमाशी यासह कथा, कादंबरी, कविता आणि समीक्षा पुस्तके लिहिली आहेत. पंढरपूरच्या नवरंगे बालकाश्रमातून आपल्या आयुष्याची सुरुवात केलेल्या लवटे यांना कोल्हापुरात सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची भूमी गवसली. लवटे यांनी मराठी, हिंदीतून विपुल ग्रंथ लेखन केले आहे. गांधीजींचे विचार आणि त्यांचे चरित्र अनेक हिंदी ग्रंथातून लिहून डॉ. पाटील यांनी फार मोठे योगदान दिले आहे. डॉ. कुंभार यांनी सलग ३८ वर्षे 'विचारशलाका', या त्रैमासिकाच्या माध्यमातून वैचारिक प्रबोधनाचे कार्य केले आहे, असे अरुण खोरे यांनी प्रास्ताविकात नमूद केले. दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE